# प्रेस नोट

दिनांक १६/१२/२०२५

श्री.संजय तुळशीराम सळमाखे, उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उप विभाग, गुहागर जि.रत्नागिरी (वर्ग १) यांना तक्रारदार यांचेकडुन लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांनी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक / पोलीस ठाणे | गुहागर पोलीस ठाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.संजय तुळशीराम सळमाखे, उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उप विभाग, गुहागर जि.रत्नागिरी (वर्ग १) |
| मागणी केलेली लाच रक्कम | ७,०००/- रुपये (सात हजार रुपये) |
| स्विकारलेली लाच रक्कम | ७०००/- रुपये (सात हजार रुपये ) |
| थोडक्यात हकिगत | तक्रारदार हे बांधकाम ठेकेदार यांचेकडे सुपरवायझर असुन बांधकाम ठेकेदार यांनी बांधकाम केलेल्या कामाचे प्रथम धावते देयक तयार केले होते. सदर देयकावर लोकसेवक संजय तुळशीराम सळमाखे, उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, गुहागर यांची स्वाक्षरी घेण्याकरीता तक्रारदार दिनांक १२/१२/२०२५ रोजी लोकसेवक यांचे कार्यालयात गेले असता लोकसेवक यांनी त्यांच्याकडे त्या देयकावर स्वाक्षरी करुन सोबत जोडलेल्या कामांचे फोटोवर स्वाक्षरी करण्याकरीता ७०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. त्याप्रमाणे उप अभियंता संजय सळमाखे यांनी तक्रारदार यांचेकडे आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी ७०००/- रुपयांची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम लगचेच स्विकारण्याचे मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे मागणी केलेली लाच रक्कम ७०००/- रुपये लोकसेवक सळमाखे यांनी आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग गुहागर कार्यालयातील उप अभियंता यांचे दालनामध्ये तक्रारदार यांचेकडून स्विकारल्यानंतर लोकसेवक सळमाखे यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| मार्गदर्शन अधिकारी | १) | मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | २) | मा.श्री.भागवत सोनावणे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ३) | मा. श्री अविनाश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी घटक |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893, Mobile No. 7588941247, 9870474535
**Office email** :- acbratnagiri@gmail.com
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB
**Whats app no** :- 7038391064

पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सत्यमेव जयते
रत्नागिरी

(सुहास रोकडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

Galaxy Z Fold6